MHGA040004562020

**<u>दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), आरमोरी, जि. गडचिरोली</u>**
**(पीठासीन अधिकारी अजित भि. मडके)**

**<u>नि.दि.मा.क्र.१४/२०२०</u>**

१. श्री. सुधाकर अर्जुन गोन्नाडे,
२. श्री. दिलीप अर्जुन गोन्नाडे,
३. प्रज्वल सुभाष नंदनकर,
४. सौ. स्नेहल अमित पोणीकर ......... **वादी**

**---विरुध्द---**

१. श्री. अर्जुन कान्हु गोन्नाडे,
२. श्री. संतोष अर्जुन गोन्नाडे,
३. जगन्नाथ कान्हु गोन्नाडे,
४. सौ. सरस्वती पांडुरंग धकाते,
५. श्रीमती आशाबाई उर्फ येधनकाला अर्जुन गोन्नाडे,
६. सौ. नंदा सुभाष नंदनवार,
७. सौ. चंदा उर्फ आदिती उदय नागपुरे ......... **प्रतिवादी**

.....................................................................................................................

वादीतर्फे वकील श्री. सी.एल. दरेकर
प्रतिवादीतर्फे वकील श्री. ए.एम.कानकाटे

.....................................................................................................................

**<u>निशाणी क्र.१० वरील आदेश</u>**
(दि.१२ डिसेंबर, २०२४ रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रातील परिच्छेद क्र.२ मधील मालमत्तेची प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कुणालाही विक्री करु नये असा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १(ब) व सहकलम १५१ अन्वये दाखल केला आहे. वादी यांच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक असुन वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ हे प्रतिवादी क्र.१ यांचे मुले आहेत. वादीने सदरचा दावा प्रतिवादी क्र.१ नी प्रतिवादी

क्र.२ ला करुन दिलेली रजिस्टर विक्रीपत्र व बक्षिसपत्र बेकायदेशिर व शुन्यवत असुन ते वादींवर बंधनकारक नाही असे घोषित करण्यासाठी तसेच दाव्यातील शेत जमिन मध्ये वादीचा १/५ अविभक्त हिस्सा असल्याबाबत दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार अर्जातील परि.क्र.१ मधील मिळकत या वडीलोपार्जित मिळकती असुन वादीला वाद मिळकत मध्ये हक्क व हिस्सा आहे. प्रतिवादी क्र.१ यानी उपरोक्त मालमत्ता बेकायदेशिरपणे प्रतिवादी क्र.२ ला विक्रीपत्र व बक्षिसपत्राद्वारे परस्पर दिली आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.२ हा दाव्यातील मालमत्ता परस्पर विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.२ नी सदरची मालमत्ता विक्री करणे बेकायदेशिर आहे कारण की, वादीचा सदरच्या मालमत्ते मध्ये हक्क व हिस्सा आहे. वादींनी प्रतिवादी क्र.२ याला दि.१५.०१.२०२० व दि.२०.०५.२०२० रोजी नोटीस पाठवुन उपरोक्त मालमत्ता वरील आपला कायदेशिर हिस्याची मागणी केली होती व तसेच हिस्सा खोडवुन देण्याबाबत कळविले होते. परंतु प्रतिवादी क्र.२ यांनी वादीचे काहीही ऐकले नाही. प्रतिवादींनी उपरोक्त मालमत्तेची विक्री केल्यास वादीच्या हक्कावर बाधा येणार आहे. त्यामुळे वादींनी हा सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.५५ नुसार सदरच्या अर्जाला उत्तर दिले आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या उत्तरा मध्ये अर्जातील नमुद वाद मिळकती वडीलोपार्जित मिळकती असल्याचे नाकारले आहे. प्रतिवादी क्र.२ यांच्या कथनानुसार वाद मालमत्ता या प्रतिवादी क्र.१ यांच्या आहेत व त्यांची मालकी व कब्जा वहिवाट असल्यामुळे तेच त्याचे खरे मालक असल्यामुळे व तेच हक्कदार असल्यामुळे सदरची मालमत्ताबाबत विल्हेवाट लावण्याचे हक्क सर्व प्रतिवादी यांना आहेत. प्रतिवादी क्र.२ यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ हे दि.०६.०१.२०२१ ला मरण पावले व ते नगर पालिका, नागपुर येथे शिक्षक या पदावर कार्यरत होते.

प्रतिवादी क्र.२ यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ यांचा सांभाळ त्यांनी स्वत: केला व त्यांचा सर्व औषोधोपचार त्यांनी केला तसेच त्यांनी त्यांची सेवासुश्रुषा केली. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी वाद मिळकत मधील मौजा आरमोरी व वाकडी येथील जमिनी व घर प्रतिवादी क्र. २ यांच्या नावे खरेदी व बक्षिसपत्र करुन दिले. प्रतिवादी क्र.२ यांच्या कथनानुसार वाद मिळकती या प्रतिवादी क्र.१ यांच्या स्वकष्ठाची मालमत्ता असल्यामुळे त्यांना सदरची मालमत्ता विल्हेवाट लावण्याचा अधिकार होता. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. अर्जातील कथनाचे व लेखी उत्तरातील कथनाचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहेत त्याचे उत्तर मी कारणामिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतात काय की, प्रथमदर्शनी वाद त्यांच्या बाजुने आहे ? | ... होय |
| २. | अनुकुलतेचा कल कोणाच्या बाजुने आहे ? | ... अर्जदाराच्या |
| ३. | सदरचा अर्ज नामंजुर केल्यास कोणाचे अपरीमित नुकसान होईल ? | ... अर्जदाराचे |
| ४. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## **का र णे मि मां सा**
## **मुद्दे क्र.१ ते ४** :-

४. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक असल्याचे दोघांनाही मान्य आहे. प्रतिवादी क्र.२ यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ यांच्या पहिल्या पत्नी कडुन वादी क्र.१,२ व ३,४, ५ ची आई विमल अशी ३ मुले त्यांना होती. प्रतिवादी क्र.१ ची पत्नी ही १९६९ साली मरण पावली, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी आशाबाई उर्फ यज्ञकला यांच्याशी लग्न केले. त्यानंतर आशाबाई व प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.२ हा मुलगा व नंदा व चंदा या मुली

झाल्या. प्रतिवादी क्र.२ यांच्या कथनानुसार वाद मिळकती या प्रतिवादी क्र.१ यांच्या स्वकष्टार्जित असल्यामुळे त्यांना सदरच्या मिळकती विल्हेवाट लावण्यासाठी संपुर्ण अधिकार आहे. वादपत्रातील कथनांचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा वादपत्रातील नमुद काही मिळकती प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ याला विक्रीपत्र व बक्षिसपत्र करुन दिल्यामुळे सदरची विक्रीपत्र व बक्षिसपत्र बेकायदेशिर आहे अशी घोषणा मिळण्याबाबत दाखल केला आहे. वादपत्रासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे व सर्व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना भु.मा.क्र.१५९ बेकायदेशिर दिलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना भु.मा.क्र.६२ व ५७२/२ मौजा आरमोरी येथे बक्षिसपत्राद्वारे विना मोबदला दिले आहे. प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादी क्र.१ यांनी आरमोरी येथील भु.मा.क्र.५२ हे विना मोबदला बक्षिसपत्राद्वारे दिलेले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना भु.मा.क्र.१९८७/२ आरमोरी येथील खरेदी खताद्वारे विक्री केलेली आहे. भु.मा.क्र.१७६६ मौजा आरमोरी येथील विक्रीपत्राद्वारे विक्री केलेली आहे. यावरुन प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना वाद मिळकती पैकी काही मिळकतीचे खरेदी खत व बक्षिस पत्र करुन दिल्या आहेत. प्रतिवादी क्र.२ यांचे कथनानुसार वाद मिळकती या प्रतिवादी क्र.१ यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. या बाबींचा उहापोह दाव्याची संपरिक्षा चालु झाल्यानंतर लक्षात येईल व वादी यांना ते पुराव्यानीशी सिद्ध करावे लागेल. सध्या परिस्थितीत वाद मिळकती या प्रतिवादी क्र.१ यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत याचा निष्कर्ष काढता येणार नाही. परंतु वादी व प्रतिवादी यांच्या नाते संबंधाचा विचार करीता निश्चितच वादी यांना वाद मिळकती मध्ये प्रथत दर्शनी हक्क आहे. अशा परिस्थिती मध्ये प्रथम दर्शनी वादींनी त्याचा अर्ज सिद्ध केलेला आहे. तसेच न्याय समतोल देखी वादीच्या बाजुने आहे.

५. प्रतिवादी क्र.२ याला वाद मिळकतींची विल्हेवाट लावण्यापासुन थांबविले नाही तर निश्चितच वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १,२,३ याचे उत्तर मी वादीच्या हक्कात देत आहे व मुद्दा क्र.४ चे अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येते आहे.

**-आ दे श-**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ किंवा त्याचेतर्फे इतरांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वाद मिळकतींची (वादपत्र परि.क्र.२ मध्ये नमुद केलेले) कोणालाही विकु नये, गहाण ठेवु नये अथवा कोणत्याही इतर मार्गाने विल्हेवाट लावु नये असा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश पारित करण्यात येत आहे.

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2024.12.12 17:07:08 +0530

दिनांक :१२.१२.२०२४

(अजित भि. मडके)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
आरमोरी, जि. गडचिरोली.